महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ३१ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




## महत्वाचे

### महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद राबवणार शिक्षक भरती प्रक्रिया

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यातली शिक्षक भरती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोपवण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली हे कामकाज होईल. परीक्षा परिषदेचे अध्यक्ष हे या समितीचे अध्यक्ष असतील तर परीक्षा परिषदेचे आयुक्त सदस्य सचिव असतील. याशिवाय इतर ३ सदस्य या समितीत असतील. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून ही परीक्षा परिषद हे काम करेल. सध्या TET अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा या परिषदेकडून घेतली जाते.

### बेहेरे -खडवली ग्रामपंचायत
### सरपंचपदी प्रियंका भोईर यांची बिनविरोध निवड



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** कल्याण तालुक्यातील बेहेरे -खडवली ग्रामपंचायत सरपंच पदी सौ.प्रियंका राजेश भोईर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल खडवली परिसरातून अभिनंदन केले जात आहे. कल्याण तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी बेहेरे -खडवली ग्रामपंचायत सरपंच पदी सौ.प्रियंका राजेश भोईर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.बेहेरे -खडवली ग्रामपंचायत मधे बेहेरे,वालकस,वावेघर ,खडवली ,ठाकुरपाडा,जु ,जिंभवणीवाडी ,पिंताबरे गांव याचा समावेश असुन सौ.प्रियंका भोईर या वावेघर गावातील रहिवासी आहेत.त्यांचा अभिनंदन करण्यासाठी शिवसेना कल्याण तालुका प्रमुख वसंत लोणे, भाजपाचे कार्यकर्ते जगन्नाथ शेळके,मंगेश शेलार,दिपक भोईर, उमेश कथोरे,नरेश कथोरे, जगन कडव, गजानन कडव, संतोष शेलार,समीर शेलार,बाळा शेलार, महेंद्र ननावरे,बाळु गोरे, गिरीश भोईर,कुंडलीक शेळके, पंडीत पाटोळे , ग्रामपंचायत ग्रामसेवक पष्टे, ग्रामपंचायत सदस्य इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निंबवली-गुरवली येथे गटविकास अधिकाऱ्यांची भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा, ता. 30 (वार्ताहर)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी ग्रामस्थांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना होणे अत्यावश्यक आहे. याच उद्देशाने कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी यांनी निंबवली-मोस आणि गुरवली या ग्रामपंचायतींना भेट देऊन सखोल पाहणी केली. ग्रामविकास विभागाच्या योजनांची मूळ ताकद ही लोकसहभागात असून, योजना नियोजनबद्ध पद्धतीने राबवण्याचा संदेश त्यांनी या दौऱ्याद्वारे दिला. आरोग्य सुविधा, सौरऊर्जा, शाळा, रस्ते, गटारे, घनकचरा व्यवस्थापन आणि सुशासन हे घटक समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे गवारी यांनी अधोरेखित केले. याचबरोबर जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या घरपट्टी-पाणीपट्टी ५० टक्के भरा आणि ५० टक्के सवलत घ्या या योजनेच्या अंमलबजावणीचा त्यांनी आढावा घेतला. एक एप्रिलआधीच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत देण्यात आली असून, उर्वरित रक्कम एकरकमी भरण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. यानंतर गुरवली ग्रामपंचायतीस भेट देऊन घरपट्टी आणि पाणीपट्टीची शंभर टक्के वसुली सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तर, जिल्हा परिषद शाळेतील मुलभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. या पाहणी दौऱ्यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान मूल्यांकन समितीचे सदस्य संजय कांबळे, निंबवलीचे उपसरपंच बबलू पाटील, सामाजिक कार्यकर्ते किरण केणे, त्रिदेव केणे, निलेश दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

## नाराजांची बंडखोरी - पक्षांतर करुन उमेदवारी पदरात !

# अर्ज भरण्याची मुदत संपली, आज होणार छाननी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

आज अखेरच्या दिवसापर्यंत अनेक ठिकाणी युती, आघाडी, उमेदवारी यादी यांचं चित्र स्पष्ट झालं नव्हतं. त्यामुळं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसह मतदारांमध्ये संभ्रम होता. त्यामुळे अनेकांनी अखेरच्या दिवशी पक्षांतर करुन उमेदवारी पदरात पाडून घेतली. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित होऊन १३७ जागी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तर ९० जागी शिवसेनेचे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. रिपब्लिकन पक्षाला जागावाटपातून वगळल्याबद्दल पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांनी विश्वासघात झाल्याची भावना व्यक्त करत ३९ जागांवर 'मैत्रीपूर्ण लढती'साठी उमेदवार जाहीर केले. आठवले यांचे काही गैरसमज झाले असतील तर ते दूर करू असंही भाजपा नेते आशीष शेलार म्हणाले. दुसरीकडे काँग्रेससोबत आघाडीमधे लढणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला वीस जागांसाठी उमेदवार कमी पडले आहेत. आघाडीमधे त्यांच्या वाट्याला ६२ जागा आल्या होत्या. उमेदवार न मिळाल्यामुळे वीस फॉर्म त्यांनी परत पाठवल्याचं काँग्रेसने नेत्यांनी सांगितलं. तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३० उमेदवारांची तिसरी यादी आज जाहीर केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबईसाठी उमेदवारांना एबी फॉर्मचं वाटप सुरु केलं असून अद्याप अंतिम उमेदवार यादी जाहीर केलेली नाही. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं मुंबईतलं माजी नगरसेवक दांपत्य स्नेहल जाधव आणि सुधीर जाधव यांनी काल एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

● दरम्यान, ज्या प्रभागात समाजवादी पार्टी निवडणूक लढत नाही अशा प्रभागात भाजपाने उमेदवारी नाकारलेल्या उत्तर भारतीय उमेदवाराला आपला पक्ष समर्थन देईल, असं आमदार अबु आझमी यांनी म्हटलं आहे. ठाण्यात शिवसेना ८७ आणि भाजपा ४० जागांवर निवडणूक लढवत असल्याचं शिवसेना खासदार नरेश म्हस्के म्हणाले. नवी मुंबईत शिवसेना १११ जागा आणि वसई विरारमध्ये २७ जागा शिवसेना लढवत असल्याची माहिती त्यांनी दिली. भिवंडी, मीरा-भाईंदरमध्ये भाजपा आणि शिवसेना युती झालेली नाही.

● **पनवेल महानगरपालिकेसाठी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पक्ष यांची युती जाहीर करण्यात आली आहे. यानुसार भाजपा ७१, शिवसेना ४, राष्ट्रवादी काँग्रेस २, आणि आरपीआय एका जागेवर लढणार आहे. राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या या अर्जांची छाननी होणार असून २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल.**

## टिटवाळ्यात शिवसेना शिंदे गटात राजीनाम्यांचं सत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण - मांडा टिटवाळा भागात विविध प्रकारची विकास कामे मार्गी लावणे. नागरिकांच्या नागरी समस्या सोडविणे ही कामे अनेक वर्ष करूनही शिवसेना शिंदे गटातील टिटवाळा मांडा भागातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना शिवसेनेने कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी न दिल्याने नाराज झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या टिटवाळा मांडा भागातील सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे सामुहिक राजीनामे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविले आहेत. निष्ठेने काम करूनही पक्ष त्याची दखल घेणार नसेल तर पक्षात काम करणे योग्य वाटत नाही, अशी नाराजी या पदाधिकाऱ्यांनी पक्षप्रमुखांना पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. राजीनामा देणाऱ्या पदाधिकाऱ्यांमध्ये मांडा टिटवाळा प्रभागाचे उपशहरप्रमुख विजय देशेकर, महिला उपशहर संघटक सुषमा शर्मा, शाखाप्रमुख अशोक चौरे, उपविभागप्रमुख दिलीप राठोड, महिला संघटक कामिनी दास, योगिता हाटे, प्रीती रामटेके, उपविभाग संघटक श्रेया जाधव, उपशाखाप्रमुख गणेश झालटे, आनंद कासेकर, अनिल विश्वासराव, विनायक गुरव, उत्तर भारतीय मांडा टिटवाळा प्रमुख अनिल दुबे यांचा समावेश आहे. या पदाधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी पालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गट, युतीचे काम न करण्याचा निर्णय घेतला आहे.

## महायुतीमुळे शिवसेना भाजपातील नाराज इच्छुकांनी उभे केले स्वतंत्र पॅनल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी/दि.30**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना भाजपाच्या कार्यकर्त्यांना स्वतंत्रपणे निवडणूक लढविणे अपेक्षित होते. मात्र पक्षातील वरिष्ठांनी घेतलेल्या निर्णयामुळे कल्याण डोंबिवलीत शिवसेना भाजपाची महायुती झाली. या युतीमुळे अनेक इच्छुकांना पक्षाची अधिकृत उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या या कार्यकर्त्यांनी आपले स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. यामध्ये काही ठिकाणी फक्त भाजपाच्या कार्यकर्त्यांनी तर काही ठिकाणी शिवसेना भाजपाच्या इच्छुकांनी एकत्र येत आपले स्वतंत्र पॅनल उभे केल्याने शिवसेना भाजपा समोर आव्हान उभे ठाकले आहे.

कल्याण मधील पॅनल क्रमांक ६ मधून महायुतीच्या जागावाटपात संपूर्ण पॅनलमधील चारही जागा शिवसेना शिंदे गटाला देण्यात आल्याने मूळ भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून थेट त्यांनी बंडखोरीचे हत्यार उगारले आहे. भाजपमध्ये अनेक वर्षे निष्ठेने काम करूनही पक्षाने दखल घेतली नाही, असा आरोप करत भाजप मंडळ उपाध्यक्ष सुधीर वायले यांनी आपली नाराजी जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर पॅनल क्रमांक ६ मधून चारही भाजप कार्यकर्त्यांनी पक्षाच्या अधिकृत भूमिकेला छेद देत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सुधीर वायले, सचिन यादवाडे, तृप्ती भोईर आणि नीता देसले यांनी बंडखोरी करत निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

पॅनल क्रमांक २ मध्ये देखील उमेदवारी न मिळाल्याने भाजपाच्या नाराज कार्यकर्त्यांनी आपले स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. यामध्ये भाजपाचे मोहने मंडल अध्यक्ष नवनाथ पाटील, त्यांच्या पती सारिका पाटील, सुवर्णा मोहन कोनकर आणि माजी नगरसेवक अर्जुन म्हात्रे यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत स्वतंत्र पॅनल उभं करत पक्षाला आव्हान दिले आहे.

त्याचप्रमाणे टिटवाळा येथे प्रभाग क्र. ३ मध्ये शिवसेना भाजपाच्या नाराज इच्छुकांनी एकत्र येऊन स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. यामध्ये दिपक कांबळे, अंजना बुधाराम सरनोबत, निता विजय देशेकर आणि मोरेश्वर तरे यांचा समावेश आहे. तर पॅनल क्रमांक 5 मध्ये देखील महायुतीला फटका बसला असून येथील सर्व जागा शिवसेनेला दिल्याने नाराज भाजपा कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. यामध्ये भाजपा कार्यकर्ता सदा कोकणे, विकास कोकतरे, माजी नगरसेवक अर्जुन भोईर यांची सून कोमल मयूर भोईर आणि साधना रवी गायकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

अशाचप्रकारे इतर अनेक प्रभागांमध्ये अनेक नाराज उमेदवारांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उद्या सर्व उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून २ आणि ३ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. त्यामुळे शिवसेना भाजपा मधील पक्ष श्रेष्ठी या नाराज उमेदवारांची नाराजी दूर करण्यात यश येते का ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

### भिवंडीत माजी खासदाराच्या मुलास
## काँग्रेसकडून उमेदवारी न मिळाल्याने निष्ठावंतांमध्ये तीव्र नाराजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि.30/भिवंडी (प्रतिनिधी)**

ज्या शहरात आम्ही हिंदू मुस्लिम एकोप्यात एवढ्या वर्ष राजकारण करत आलो त्या भिवंडी शहरात महापालिका निवडणुकीत प्रभागात हिंदू मतदार कमी असल्याने माझ्या मुलाला उमेदवारी नाकारल्याने दुःख होत असल्याची खंत भिवंडी लोकसभेचे माजी खासदार सुरेश टावरे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली असून लवकरच आपल्या कार्यकर्त्यांसोबत बोलून योग्य तो राजकीय निर्णय घेणारा त्याची प्रतिक्रिया दिली आहे.

माजी खासदार सुरेश टावरे यांच्या मुलाला व त्यांच्या निष्ठावंत समर्थकांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी नाकारल्याची माहिती भिवंडीत पसरताच पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत पक्षाच्या धोरणा बाबतीत संताप व्यक्त केला आहे.

भिवंडी लोकसभेचे माजी खासदार सुरेश टावरे यांनी आपला मुलगा मृगस्य यासाठी प्रभाग क्रमांक ७ मधून काँग्रेस पक्षा कडे अधिकृतउमेदवारी मागितली होती. त्याबाबत प्रदेश पदाधिकाऱ्यांनी सुद्धा आश्वासन दिले होते.पण ऐनवेळी भिवंडी काँग्रेस शहराध्यक्ष रशीद ताहीर मोमीन यांनी सुमारे २७ हजार मतदारसंख्या असलेल्या प्रभागात अवघे २ हजार हिंदू मतदार असल्याने उमेदवारी देण्यास नकार दिला. तर या गोष्टीला प्रदेश पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शवत माझ्या मुलाची उमेदवारी नाकारली हे पाहिल्यावर सेक्युलर असलेल्या काँग्रेस कडून आता कोणती अपेक्षा कराल असा सवाल माजी खासदार सुरेश टावरे यांनी उपस्थित करीत,मी स्वतः या विभागातून निवडून आलो होतो. आमचे एवढ्या वर्षांचे सलोख्याचे संबंध असताना आज धर्म आडवा कसा आला अशी खंत बोलून दाखवली आहे.



### काँग्रेस पक्ष समाजवादीचे आमदार रईस शेखांसमोर हतबल ?


सन2017 मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले होते त्यामुळे यंदाचे निवडणुकीत भिवंडीत काँग्रेस पक्षाला पोषक वातावरण असताना सर्वच प्रभागातून शेकडो इच्छुक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी नी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. असे असताना ऐनवेळी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख व प्रदेशाध्यक्ष अबू आजमी यांच्यात वादंग झाल्याने आमदार रईस शेख यांनी थेट काँग्रेस पक्षाच्या प्रदेश काँग्रेस मधील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना मॅनेज करीत भिवंडी पूर्व विभागाची जबाबदारी स्वीकारली.त्यामुळे पक्षाने पक्षाशी कोणताही संबंध नसलेल्या आ.रईस शेख यांच्याकडे परस्पर ४० एबी फॉर्म दिले गेले. ज्यामुळे भिवंडी पूर्व मधील काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांच्या मेहनतीवर पाणी फिरवण्याचे काम पक्षाने केले असून पक्ष रईस शेख यांच्या समोर हतबल झाला आहे अशी टीका माजी खासदार सुरेश टावरे यांनी केली आहे. अनेक प्रभागात पक्षाचे एबी फॉर्म असतानाही ते न भरता दुसऱ्या पक्षाचे एबी फॉर्म भरत असल्याने उद्या समाजवादी व काँग्रेस या दोन्ही पक्षांवर रईस शेख ताबा मिळवला तर आश्चर्य वाटायला नको अशी खंत सुरेश टावरे यांनी व्यक्त केली आहे.

## निवडणूक कर्तव्यावर हजर न झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण / दि.30**

**कल्याण डोंबिवली महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 निर्विघ्नपणे व पारदर्शक रितीने पार पडावी, या दृष्टीकोनातून महापालिका प्रशासनाने निवडणूक कामी अनेक अधिकारी/कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तथापि, काही अधिकारी/कर्मचारी अद्यापपर्यंत निवडणूक कर्तव्यावर हजर न झाल्याचे निदर्शनास आले आहे.**




कल्याण डोंबिवली महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे *निवडणूक कर्तव्यावर अद्यापही हजर न झालेले, प्रामुख्याने "VST", "FST" व "SST" या पथकातील अधिकारी/कर्मचारी व "झोनल अधिकारी" म्हणून नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचेवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सहा.आयुक्त संदीप रोकडे यांस दिले आहेत. सदर आदेशानुसार एकूण 28 अधिकारी कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत तसेच मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर नियुक्त करण्यात आलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांना देखील नोटिसा बजावण्यात आले असून त्यांना कर्तव्यावर हजर होण्याची एक संधी देण्यात आली आहे.. सदर कर्मचारी निवडणुकीच्या कर्तव्यावर हजर न झाल्यास संबंधितांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 च्या तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात येतील असा गंभीर इशारा आयुक्त महोदय यांच्यावतीने देण्यात आला आहे.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ बुधवार
३१ डिसेंबर २०२५

# ...तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल




३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळया काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो.

छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

जुने जाऊ द्या मरणागुनी.....
जाळूनी किंवा पुरूनी टाका....

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

**-श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**

## ठाणे जिल्ह्यात
# नवीन कामगार कायद्यांबाबत मार्गदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**कल्याण** : केंद्र सरकारने नवीन कामगार कायदे लागू करण्यासाठी अध्यादेश काढला आहे. या पार्श्वभूमीवर हे नवीन कायदे बाबत माहिती सर्वांना व्हावी तसेच भारतीय मजदूर संघाची या कायद्याविषया संदर्भातील भूमिका स्पष्ट व्हावी, या उद्देशाने नवीन कामगार कायदे बाबत मार्गदर्शन मेळावा रविवारी विनायक सभागृह गणेश मंदिर संस्थान डोंबिवली पूर्व येथे भारतीय मजदूर संघ ठाणे जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

मेळाव्याची सुरुवात बेबीनंदा कांबळे यांनी श्रमिक गीताने केली. तद्नंतर मान्यवरांचे हस्ते भगवान विश्वकर्मा, भारतमाता आणि श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष सचिन कदम यांच्या हस्ते मान्यवरांचा स्वागत व परिचय करण्यात आला. या कार्यक्रमात कल्याण जनता सहकारी बँकेचे सीईओ अनंत कुलकर्णी उपस्थित होते. भा. म. संघ महाराष्ट्र प्रदेश महामंत्री किरण मिलगीर यांनी नविन कामगार कायदयांसंदर्भात मार्गदर्शन केले. जुने सर्व क्लिष्ट कायदे एकत्रित करून सुटसुटीत असे चार लेबर कोड करण्यात आले असून त्यांचा वापर करणे अत्यंत सोपे जाणार आहे. कामगारांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे कुणीही खोट्या अपप्रचाराला बळी पडू नका असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती असलेले केंद्रीय कार्यसमिती सदस्य आणि ट्रस्ट व ऑडिट विभागप्रमुख मोहन येणुरे यांनी बदललेल्या नविन कायद्यांची अंमलबजावणी व आवश्यकता या बद्दल माहिती दिली. सदरचे कामगार कायदे तयार होत असताना भारतीय मजदूर संघाने पार पाडलेली भूमिका त्यांनी समजावून सांगितली. कार्यक्रमाचा समारोप करताना जिल्हा अध्यक्ष सचिन कदम यांनी नविन कामगार कायदे जास्तीत जास्त कामगार वर्गापर्यंत पोचवण्याची ठाणे जिल्ह्यातील सर्व उद्योगांमध्ये मार्गदर्शन मेळावे घेण्यात यावे असे उपस्थित कार्यकर्त्यांना आवाहन केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव विलास आंबेकर यांनी केले. कार्यक्रमात नविन कायद्यांन संदर्भात माहिती देणारे पत्रक वाटप करण्यात आले व राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.




शिवसेनेचे अधिकृत उमेदवार अर्जुन बाबू पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज प्रभाग क्रमांक 30 मधून "ग" प्रभाग क्षेत्र कार्यालयात कार्यालयात दाखल केला.



शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार सौ संगीता अनिल म्हात्रे यांनी प्रभाग क्रमांक 30 मधून आपला उमेदवारी अर्ज "ग" प्रभात क्षेत्र कार्यालयात दाखल केला.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार कदम गजानन भोईर यांनी प्रभाग क्रमांक 22 मधून "ह" प्रभागक्षेत्र कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार सौ.रंजना मितेश पेंडकर यांनी डोंबिवली "फ" विभाग कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# डिजिटल माध्यमांमधील जाहिरातींसाठी महानगरपालिकेच्या "माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती" ची पूर्वपरवानगी अनिवार्य

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** मा. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आता कोणत्याही उमेदवाराला किंवा राजकीय पक्षाला डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर जाहिरात करतांना महानगरपालिकेच्या "माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती" ची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

निवडणूक प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या फेसबुक, व्हॉट्सअप, युट्युब, इंस्टाग्राम यासारखी समाज माध्यमे, दूरदर्शन, केबल वाहिन्या, आकाशवाणी (रेडिओ), खाजगी एफएम, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले, ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस आणि व्हाईस मेसेजेस अशा सर्व प्रकारच्या माध्यमांद्वारे निवडणूक काळात पक्षीय आणि उमेदवारांकडून केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी ही बंधने घालण्यात आली आहेत. डिजिटल माध्यमांमध्ये केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी संबंधित उमेदवार व पक्षांना माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे अर्ज करावा लागणार आहे. या अर्जानुसार परवानगी घेतल्यावरच जाहिरात प्रसारित करण्याची मुभा दिली जाणार आहे. जाहिरात प्रसारित करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी समितीकडे "परिशिष्ट ४" नुसार अर्ज करणे आवश्यक आहे. पूर्वप्रमाणनाच्या अर्जासोबत प्रस्तावित जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्या लागतील.

मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील ही समिती अर्जाची छाननी करून तीन कार्यालयीन दिवसांच्या आत त्यावर निर्णय देईल. समितीने जाहिरातीमध्ये काही बदल किंवा दुरूस्ती सुचविल्यास संबंधित उमेदवार किंवा पक्षावर त्याचे पालन करणे बंधनकारक असेल. जर समितीने जाहिरातीला पूर्वप्रमाणन दिले नसेल तर तशी जाहिरात कोणत्याही माध्यमांद्वारे प्रसिध्द करता येणार नाही. डिजिटल माध्यमांद्वारे पक्षाने जाहिरात केल्यास त्या जाहिरातीवरील खर्च हा संबंधित पक्षाचा खर्च म्हणून गणला जाईल. तर उमेदवाराने केलेल्या जाहिरातीचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात जोडला जाणार आहे. जाहिरातीसाठी केलेला खर्च लपवणे किंवा विनापरवानगी जाहिराबाजी करणे निवडणूक नियमांचे उल्लंघन ठरविण्यात येणार आहे. उमेदवार व पक्षांबरोबरच जाहिरात प्रसारित करणाऱ्या चॅनेल्स आणि केबल नेटवर्क मालकांनाही याविषयी सूचना देण्यात येत आहेत. पूर्वप्रमाणन प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रसार माध्यमांनी कोणतीही राजकीय जाहिरात स्वीकारू नये, असे आवाहन महापालिका प्रशासनामार्फत सदर पेसनोटद्वारे करण्यात येत आहे.

# 'माझे मत – माझे भविष्य' अभियान स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केली मतदान जनजागृती




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (30) :** 'माझे मत- माझे भविष्य' ..“आम्ही राबवू स्वच्छता अभियान, पण तुम्ही करा हक्काने मतदान” अशा घोषणा देत स्वच्छता कर्मचाऱ्यांनी उथळसर प्रभाग समिती अंतर्गत मतदार जनजागृती अभियान यशस्वीपणे राबविले. महापालिका आयुक्त निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखली, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त तथा स्वीप नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने स्वीप उपक्रमांतर्गत शहरातील विविध ठिकाणी मतदानाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या पुढाकाराने स्वीप (SVEEP) पथकाच्या वतीने उथळसर प्रभाग समितीअंतर्गत (प्रभाग क्र. 10,11 व 12) मतदार जनजागृती अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. आंबे घोसाळे तलाव व केसर मिल सर्कल परिसरात स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून 'माझे मत – माझे भविष्य' या संकल्पनेवर आधारित हे अभियान आयोजित करण्यात आले.

या अभियानात स्वच्छता कर्मचाऱ्यांना मतदानाचे महत्त्व, लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे स्थान तसेच प्रत्येक नागरिकाची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मतदान का करावे, मतदानाद्वारे सक्षम लोकशाही कशी बळकट होते, याची माहिती देत उपस्थितांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. यावेळी मतदान जनजागृतीपर सामूहिक घोषणा देण्यात आल्या तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत मतदानाची सामूहिक शपथ घेण्यात आली.

मतदान हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य असून तो एक महत्त्वाचा अधिकार आणि जबाबदारी आहे, याची जाणीव उपस्थित कर्मचाऱ्यांना करून देण्यात आली. सर्वांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांना तसेच परिसरातील नागरिकांना मतदानासाठी प्रवृत्त करावे व आगामी निवडणुकीत न चुकता मतदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या जनजागृती कार्यक्रमात स्वच्छता कर्मचाऱ्यांनी “आम्ही राबवू स्वच्छता अभियान, पण तुम्ही करा हक्काने मतदान”अशी घोषणा देत मतदारांना उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन केले. अभियानामुळे परिसरात मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून लोकशाही सहभाग वाढविण्यास हातभार लागला आहे.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तक्रार निवारण कक्ष सक्रिय नागरिकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (30)** : आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व नियमबद्ध रितीने पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. निवडणुकीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध तक्रारींचे तात्काळ निवारण व्हावे, या उद्देशाने हा कक्ष सुरू करण्यात आला असून नागरिकांनी +91 91528 17252 दूरध्वनी क्रमांकावर किंवा tmcelectiongrievance@thanecity.gov.in ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी केले आहे.

निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, बेकायदेशीर प्रचार, भिंतींवर पोस्टर्स-बॅनर्स लावणे, मतदारांवर दबाव, पैशांचा किंवा वस्तूंचा गैरवापर, खोटी माहिती पसरवणे, मतदान प्रक्रियेशी संबंधित अडचणी, तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांविषयीच्या तक्रारी याबाबत नागरिक या तक्रार निवारण कक्षात संपर्क करू शकतात. प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन त्यावर तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

तक्रार निवारण कक्षात प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून संबंधित विभाग, क्षेत्रीय अधिकारी, पोलीस प्रशासन व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून तक्रारींचे वेळेत निराकरण केले जाणार आहे. तक्रार करणाऱ्या नागरिकांची माहिती गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून स्वच्छ, मुक्त व निष्पक्ष निवडणूक पार पाडण्यासाठी नागरिकांनी या तक्रार निवारण व्यवस्थेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नौपाडा भाजी मंडईत दुमदुमला मतदार जनजागृतीचा नारा




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (30)** - आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर नौपाडा–कोपरी प्रभाग समिती अंतर्गत स्वीप (SVEEP) पथकाच्या वतीने मतदार जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. “मतदान हा माझा अधिकार असून ते माझे राष्ट्रीय कर्तव्य आहे,” याची जाणीव करून देत लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे मत किती महत्त्वाचे आहे याबाबतची जनजागृती या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी उपायुक्त तथा स्वीप नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने शहरातील विविध परिसरात जनजागृती अभियाना राबविण्यात येत आहे. प्रभाग क्रमांक 19,20,21 व 22 च्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रज्ञा सावंत यांच्या पुढाकाराने नौपाडा भाजी मंडई परिसरात हा उपक्रम राबविण्यात आला.

नौपाडा भाजी मंडईत दररोज मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येत असल्याने या ठिकाणी मतदार जनजागृतीसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाजी विक्रेते, ग्राहक तसेच स्थानिक नागरिक यांच्या सक्रिय सहभागातून हा कार्यक्रम पार पडला. यावेळी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.

मतदानाच्या दिवशी सर्व कामे बाजूला ठेवून उज्ज्वल भविष्यासाठी आपला मतदानाचा हक्क बजावावा. येत्या 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते 5.30 या वेळेत होणाऱ्या मतदान प्रक्रियेत सर्व पात्र नागरिकांनी न चुकता सहभागी व्हावे, असे आवाहन स्वीप पथकाच्या वतीने करण्यात आले.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

## भविष्यवेध



**बुधवार**
**३१ डिसेंबर २०२५**

**मेष**
ऑफीसमध्ये सहकारी तुमच्या कल्पनांनी प्रभावित होतील, पण तुम्ही इतरांच्या कामात हस्तक्षेप करणे टाळले पाहिजे. कामे अधिक सहजपणे पूर्ण होतील.

**वृषभ**
काम करण्याच्या नवीन पद्धतींचा विचार कराल. आज तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील. इच्छाशक्तीच्या बळावर योजना अंमलात आणू शकाल.

**मिथुन**
मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील. उधार घेतलेले पैसे परत मिळतील आणि व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क**
मित्र बनवताना आणि तुमचे विचार इतरांशी शेअर करताना काळजी घ्या. सगळी गुपितं सांगू नका. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**सिंह**
यश जरी लहान असले तरी ते सातत्यपूर्ण राहील, ज्यामुळे सकारात्मक वाटेल. ऑफिसची कामे पूर्ण करताना लक्ष केंद्रित करा. सकारात्मक परिणाम होतील.

**कन्या**
तुमच्या वडिलांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका, कारण भविष्यात हे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ**
करिअरमध्ये प्रगती करण्याच्या तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल. प्रिय व्यक्तीच्या भेटीने तुम्ही आनंदी व्हाल. सकारात्मक प्रतिमा इतरांसमोर उजळेल.

**वृश्चिक**
तुमची आर्थिक परिस्थिती आणखी मजबूत होईल. गणरायाची कृपा असेल. सामाजिक कार्यात योगदान देण्याचा विचार कराल. अडकलेले पैसे परत मिळतील

**धनु**
तुमच्या सकारात्मक विचारसरणीचा वापर अर्थपूर्ण कामात केला तर तुमची सर्जनशील प्रतिभा सर्वांसमोर येईल आणि लोकांमध्ये तुमचा आदर वाढेल.

**मकर**
आवश्यक वस्तू खरेदी करण्यास मदत होईल. वैवाहिक जीवन अधिक सुसंवादी होईल. नकारात्मक विचार दूर करून आणि वाईट संगत टाळून स्वतःला सुधाराल.

**कुंभ**
सहकारी आणि वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर खूश होतील आणि तुमची प्रशंसा करतील. योग्य ते निकाल मिळतील. हवे असलेले मोठे ध्येय साध्य करण्याचा मार्ग सापडेल.

**मीन**
आर्थिक परिस्थिती मजबूत राहील आणि वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाऊ शकता. प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अनुकूल काळ आहे



अपक्ष उमेदवार प्रियांका अमित कार्लेकर यांनी प्रभाग क्रमांक २४ ब प्रभागातू आपला उमेदवारी अर्ज "ग" प्रभाग क्षेत्रात दाखल केला.

# नोवेल साळवे यांचे आझाद मैदानात बेमुदत उपोषण आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : राज्य सरकारने १५ दिवसांपासून आझाद मैदान येथे धरणा आंदोलन करत असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी सरकार त्यांच्या आंदोलनाची दखल घेत नसल्याकारणाने साळवे यांनी आपले आंदोलन तिव्र करून आजपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. काही महिन्यांपूर्वी नोवेल साळवे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्यावर त्यांचे ओपन हार्ट सर्जरी झाले होते तरीही एका आजारी माणसाला शासनाच्या नाकर्तेपणामुळे न्याय मिळत नसल्याकारणाने जीव धोक्यात टाकून आंदोलनाचा पवित्रा घ्यावे लागत आहे. नागपूर च्या हिवाळी अधिवेशन सुरू झालेल्या दिवसांपासून साळवे यांनी



आझाद मैदानावर न्याय मिळण्यासाठी आंदोलन सुरू केले होते व त्यांनी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली की त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करणारे लोकांवर गुन्हा दाखल करून दोषींना वाचविणारे उल्हासनगर येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना करण्यात यावी, परंतु आजपर्यंत कुठलीच कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे साळवे यांनी आजपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

## उल्हासनगर महानगरपालिका

### निवडणूक विभाग

मुख्य कार्यालय, दूसरा मजला, उल्हासनगर - ४२१००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No:- 0251-2720116/125 Ext. No. 237

### उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५
### जाहीर सूचना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ |
| २ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी येथे उपलब्ध आहे. | १) निवडणूक विभाग, महानगरपालिका मुख्यालय<br>२) निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्र. १ ते ६ |

ठिकाण : उल्हासनगर
दिनांक : ३१ डिसेंबर, २०२५

जा. क्र. उमपा/पिआरओ/४६४ /२०२५
दिनांक : ३१ डिसेंबर, २०२५

सही /-
(मनिषा आव्हाळे, भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# केडीएमसीत यादी जाहीर न करता अखेरच्या दिवशी दिले एबी फॉर्म

## युतीत प्रवेश करणाऱ्यांना डावलल्याने मनसे, उबाठाची धरली कास





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी प्रस्थापित पक्षाच्या जागा वाटपाची गणिते त्याच पक्षातील बंडाळी पाहता महायुतीच्या भाजपा व शिवसेना शिंदे पक्षाने सावध भूमिका घेत पक्षाची उमेदवारांची यादी घोषित न करता उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी पक्षाचा एबी फॉर्म दिल्याने उमेदवारांची उमेदवारी अर्ज भरण्यासाठी चांगलीच दमछाक झाली. महायूती कडून शिवसेना शिंदे पक्ष ६६, भाजपा ५६ जागा वर लढणार तर मनसे शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष एकत्रित मनसे ५४ तर शिवसेना उद्धव ठाकरे ६८ जागा वर उमेदवार उभे केलेत, युतीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट स्वबळावर लढणार असून ४० जागावर उमेदवार उभे केलेत.

कॉंगेस ५८ जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार ३५ तर वंचित बहुजन आघाडी १५ जागा वर उमेदवार उभे केले आहेत असे एकूण पाच आठ पक्षा कडून ३९२ उमेदवार रिंगणात उभे केले आहेत.त्यामुळे पालिकेची निवडणुका काही ठिकाणी तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी लढत होणार असल्याचे दिसून येत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूक साठी ३१ पॅंनल मधील १२२ जागा साठी भाजपा, शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट महा युती तील भाजपा शिवसेना शिंदे पक्षाची युतीची जागा वाटप झाले. या जगा वाटपात भाजपाला जागा ५६, तर शिवसेना शिंदे पक्षाला ६६ जागा मिळाल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेत ४२ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. शिवसेना शिंदे गट व भाजपा युतीने आपल्या पक्षाची उमेदवार यादी जाहीर न करता काहीना सोमवारी रात्री उशिरा तर काहीना मंगळवारी सकाळी पक्षाचे एबी फॉर्मचे वाटप केले. तर दुसरीकडे मनसे, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष व त्याचे मित्र पक्ष कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट पक्षाची जागा वाटपात बिघाड झाल्याने कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाने वंचित बहुजन आघाडी बरोबर तिसरी आघाडी करून बाहेर पडले.

मनसेने ५४ जागा तर शिवसेना उद्धव ठाकरे गट ६८ जागा वर दोन्ही पक्षांनी उमेदवार उभे करून त्यांना एबी फॉर्म दिले. कांग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट व वंचित आघाडीने एकत्रित लढण्यासाठी कॉंग्रेसने ५८,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार ३५ तर वंचित बहुजन आघाडी १५ अश्या १०८ जागावर उमेदवार उभे करून त्यांना आपआपल्या पक्षाचे एबी फॉर्म दिल्याने कल्याण डोंबिवलीतील शिवसेना शिंदे गट, भाजपा, मनसे, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट, कॉंग्रेस ,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

## कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणूकीसाठी शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वतीने

# उमेश बोरगावकर, संकेश भोईर, स्वप्नाली केणे, अपर्णा भोईर यांचे अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : कल्याण/डोंबिवली महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आज माजी नगरसेवक श्री. उमेश धोंडू बोरगावकर, शाखाप्रमुख संकेश रघुनाथ भोईर, सौ. स्वप्नाली विनोद केणे आणि सौ. अपर्णा संतोष भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज अत्यंत उत्साहात आणि मोठ्या शक्तीप्रदर्शनाने दाखल केला.**





श्री. संकेत रघुनाथ भोईर, उमेदवारी अर्ज भरताना. प्रभाग क्रमांक 06 चिकनघर, रामबाग, कल्याण. KDMC

यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक, ज्येष्ठ शिवसैनिक आणि युवा सैनिकांनी उपस्थित राहून उमेदवारांना आपला पाठिंबा दर्शवला. भगवे झेंडे आणि शिवसैनिकांच्या घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला होता.



अपर्णा संतोष भोईर

**प्रमुख ठळक मुद्दे: विकासाचे व्हिजन:** "प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या प्रलंबित समस्या सोडवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे," असे आश्वासन यावेळी उमेदवारांनी दिले.

**जनतेचा आशीर्वाद:** जेष्ठ शिवसैनिकांचे मार्गदर्शन आणि तरुणांचा उत्साह यामुळे विजयाचा मार्ग सुकर असल्याचा विश्वास श्री. उमेश बोरगावकर यांनी व्यक्त केला.

**मोठ्या विजयाची ग्वाही:** नागरिकांच्या विश्वासाच्या जोरावर आणि सहकार्याने आम्ही मोठ्या मताधिक्याने विजयी होऊ, अशी खात्री सर्व उमेदवारांनी यावेळी बोलताना दिली. प्रभागातील रस्ते, पाणी आणि आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी 'विकासाचे व्हिजन' समोर ठेवून ही निवडणूक लढवली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने एस. एस. सी.व्याख्यानमाला संपन्न





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खडवली** : दि:२९ रोजी अनुदानित आश्रमशाळा खडवली येथे भागु बाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था फळेगाव यांच्या माध्यमातून एस् एस् सी . व्याख्यान मालाचे आयोजन करण्यात आले होते या व्याख्यानमालेत मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित झाले. उपस्थित शिक्षक माननीय श्री जितेंद्र मेहेर सर माननीय श्री रुपेश कुमार कदम सर व मा.श्री.नरेश सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आली. या व्याख्यानमालेसाठी मान्यवर म्हणून श्री अर्जुन चव्हाण सर श्री रमेश बांगर सर श्री दत्तात्रेय जाधव सर श्री रविंद्र घोडविंदे सर श्री सचिन तळपाडे सर माननीय श्री जगदीश लोणे सर श्री चंद्रकांत भोईर सर श्री योगेश पवार सर श्री विकी रोंगटे सर , श्री दीपक चव्हाण सर, श्री रमेश जाधव सर, श्री जगदीश चव्हाण सर व पत्रकार म्हणून श्री तानाजी लोणे, श्री प्रदीप घायवड, श्री राहुल भोईर ,श्री मनोज ताटे,विजय तांबे व मंगेश तारमळे सर हे उपस्थित होते

हा सोहळा संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री संजय जाधव सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला यासाठी सचिव सौ.निरा जाधव मॅडम यांनी व स्वाती मॅडम, रोहिणी मॅडम यांनी विशेष मेहनत घेतली या व्याख्यानमालेत आदिवासी आश्रम शाळा खडवली, बेलकडे विद्यालय खडवली, विभागीय माध्यमिक विद्यालय काकडपाडा, माध्यमिक हायस्कूल निंबवली, सरस्वती विद्यालय वासिंद, गंगा गोरजेश्वर विद्यामंदिर फळेगाव या विद्यालयातील 400 विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चंद्रकांत भोईर सर यांनी केले तर स्वागत गीत व ईशस्तवन खडवली आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

# पेण : महिलेचा विनयभंग दोघांविरोधात गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण पोलीस ठाणे हद्दीत एका महिलेस उद्देशून अश्लील शिवीगाळ करणे व विनयभंगाचा गंभीर प्रकार घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.सदरची घटना२६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून, पीडित महिलेच्या फिर्यादीवरून पेण पोलिसांनी दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार पहिल्या आरोपीने महिला फिर्यादी यांना उद्देशून अश्लील शिवीगाळ केली. अश्लील व अपमानास्पद वक्तव्यांमुळे महिला फिर्यादी मानसिकदृष्ट्या त्रस्त झाल्या. याच वेळी दुस-या आरोपीने फिर्यादी यांच्या अंगाला किळसवाणा स्पर्श केला. या प्रकारामुळे फिर्यादी यांच्या स्त्रीमनास लाज उत्पन्न झाली असून, हा प्रकार गंभीर स्वरूपाचा असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

घटनेनंतर महिला फिर्यादी यांनी धैर्य दाखवत थेट पेण पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीच्या आधारे पेण पोलीस ठाण्यात गुरनं. २९७/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७९, ११५(२), ३५१(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मायणी शाळेतील विद्यार्थी बनले रिपोर्टर

## 'जाणूया आपले गाव' उपक्रमाने गावक-यांचे लक्ष वेधले





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : आजच्या धकाधकीच्या आणि डिजिटल युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांना आपल्या परिसराशी, संस्कृतीशी व इतिहासाशी जोडण्याचा अभिनव उपक्रम पेण तालुक्यातील गागोदे केंद्रातील रा. जि. प. शाळा मायणी कोयना येथे राबविण्यात येत असलेल्या "जाणूया आमचे गाव" या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थी थेट रिपोर्टरच्या भूमिकेत उतरून आपल्या गावाची ओळख संपूर्ण समाजास करून देत आहेत.

प्रत्येक गावाला केवळ भूगोल नसतो, तर त्याला स्वतःचा इतिहास, परंपरा, संस्कृती,वैशिष्ट्ये आणि धार्मिक अध्यात्मिक वारसा असतो, ही संकल्पना या उपक्रमामागे आहे. विद्यार्थ्यांनी गावातील ऐतिहासिक स्थळे, धार्मिक परंपरा, ग्रामदैवत, सण-उत्सव, प्रसिद्ध व्यक्ती, लोककला, व्यवसाय व नैसर्गिक वैशिष्ट्ये यांची माहिती संकलित करून ती प्रभावीपणे सादर केली आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, संवादकौशल्य, आत्मविश्वास व चिकित्सक विचार सभाधीटपणा संभाषण विकसित होत असून गावकऱ्यांनाही आपल्या गावाचा अभिमान वाटत आहे. विशेष म्हणजे या उपक्रमाला ग्रामस्थ, पालक व मान्यवरांकडून मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे.


मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाला सहाय्यक शिक्षक अमित महागावकर, मंगेश पाटील यांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे.हा उपक्रम ग्रामीण भागातील शाळांसाठी प्रेरणादायी ठरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घालत आहे. या अस्तित्व उपक्रमाबद्दल गावातील सुजाण पालक केंद्र शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी कौतुक केले.

# शेवटच्या दिवशी उमेदवारांच्या कोलांट्या उड्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी उमेदवारी न मिळाल्याने दुसऱ्या पक्षाचा झेंडा हाती घेत एका पक्षातून दुसऱ्या पक्षात कोलांट्या उड्या मारल्याचे पाहायला मिळाले.

केडीएमसीमध्ये अपक्ष म्हणून निवडून आलेले फैजल जलाल यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. मात्र, आपल्याला उमेदवारी मिळणार नाही याची कुणकुण लागताच, त्यांनी काल अचानक राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाच्या कार्यालयाची वाट धरली. तिथे राष्ट्रवादीचे प्रवक्ते महेश तपासे आणि जिल्हाध्यक्ष वंडार पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्षप्रवेशाचा सोपस्कार पूर्ण केला. विशेष म्हणजे, अवघ्या काही मिनिटांतच त्यांनी पक्षाचा 'एबी फॉर्म'ही खिशात घातला. आज त्यांनी प्रभाग क्र. ८ मधून राष्ट्रवादी शरद पवार पक्षातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी नगरसेवक उमेश बोरगावकर हे आपल्या प्रभागात क्लस्टर योजना राबविण्यासाठी शिवसेना शिंदे गटात गेले होते, मात्र प्रभाग क्र. ६ मधून त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी हाती मशाल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मनसेचे शाखा अध्यक्ष संदीप पंडित यांना देखील मनसेने उमेदवारी न दिल्याने त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटातून आपला उमेदवारी अर्ज भरला.कल्याण पूर्वेतील कॉंग्रेसचे माजी नगरसेवक उदय रसाळ यांनी देखील शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता, मात्र अखेरच्या दिवशी उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी शिवसेना ठाकरे गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला. तर गेली अनेक वर्षे भाजपात सक्रीय असलेले डोंबिवलीतील माजी नगरसेवक शैलेश धात्रक आणि त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका मनीषा धात्रक यांनी भाजपातून उमेदवारी न मिळाल्याने मनसेच्या इंजिनात स्वार होत आपल्या मुलीसह मनसे पक्षातून प्रभाग क्र. २५ मधून तिघांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून भाजपामध्ये दाखल झालेल्या माजी नगरसेविका शीतल मंढारी यांना देखील उमेदवारी देण्याचे आश्वासन भाजपातर्फे देण्यात आले होते. मात्र उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी देखील मनसे पक्षातून उमेदवारी अर्ज भरला आहे. डोंबिवली शिवसेना शिंदे गटातील विभाग प्रमुख अमोल पाटील यांच्या पत्नी लीना पाटील यांनी मनसेतून तसेच शिवसेना शिंदे गटातीलच संदेश पाटील आणि त्यांच्या पत्नी रसिका पाटील या दोघांनी देखील मनसेतून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूल्यांचा अनुभव देणारा शिवसंस्कार महोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील कालातीत मूल्ये आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने, कल्याण एज्युकेशन सोसायटी यांच्या श्रीमती के. सी. गांधी शाळेच्या आयोजनाखाली आणि सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई निर्मित व प्रस्तुत 'शिवसंस्कार महोत्सव २०२६' हा पाच दिवसीय शैक्षणिक-सांस्कृतिक उपक्रम दि. ६ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान कल्याण पश्चिमेतील के. सी. गांधी शाळेच्या भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.
हा महोत्सव केवळ इतिहासाचे सादरीकरण नसून, आजच्या विद्यार्थ्यांसाठी, तरुणांसाठी आणि नागरिकांसाठी देशभक्ती, नेतृत्व, नीतिमत्ता, चारित्र्य आणि एकात्मतेची जाणीव करून देणारा अनुभवप्रधान उपक्रम आहे. गेली पंधरा वर्षे सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई ही संस्था छत्रपती शिवाजी महाराजांचा हा अनमोल वारसा जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.शिवसंस्कार महोत्सव २०२६ अंतर्गत 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालन' हे या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहे. हे कलादालन दि. ६ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान सकाळी १०.३० ते दुपारी ३.३० या वेळेत विद्यार्थ्यांसाठी आणि सायंकाळी ४.३० ते रात्री ८.०० या वेळेत नागरिकांसाठी शाळेच्या पटांगणात खुले राहणार आहे. या शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालनासाठी ज्या शाळांनी सकाळच्या वेळचे स्लॉट्स नोंदविले आहेत त्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पूर्णतः विनामूल्य ठेवण्यात आला आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार परेश लहू पाटील यांनी प्रभाग क्रमांक 30. क मधून आपला उमेदवारी अर्ज " ग "प्रभातक्षेत्र कार्यालयात दाखल केला.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ निकिता परेश पाटील 30 ब प्रभागातून आपला उमेदवारी अर्ज प्रभाग कार्यालयात दाखल केला.



पॅनल क्रमांक 28 मधून अ ब क ड विभागातून चार शिवसेनेचे अधिकृत उमेदवार हर्षद राजेश पाटील, सुरज राजन मराठे, सौ.स्वप्राली स्वप्रील पाटील, सौ ज्योती राजन मराठे या चारही उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज "ग" प्रभाग क्षेत्र कार्यालयात दाखल केला. ची माहिती कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी दिली.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार घारीवली गावचे माजी सरपंच योगेश पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज "ग" प्रभाक्षेत्र कार्यालयात दाखल केला



भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार सौ.रंजना मितेश पेंडकर यांनी डोंबिवली "फ" विभाग कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# केडीएमसी निवडणूक : शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची झुंबड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पालिकेच्या नऊ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात अर्ज भरण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांची झुंबड केली होती. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणा पर्यंत निवडणूक अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या इच्युक उमेदवारांना निवडणूक निर्णय कार्यालयात प्रवेश दिल्याने उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरा पर्यंत सर्वच निवडणूक निर्णयात सुरू होती.



कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या ३१ पॅनल मधील १२२ जागांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या मंगळवारी अखेरच्या दिवशी सकाळी नऊ वाजल्या पासून इच्छुक उमेदवारांनी आपल्या निवासस्थाना पासून वाजत गाजत आपल्या शेकडो समर्थकांसह उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात दाखल झाले होते. सकाळ पासूनच पालिकेच्या वॉर्ड ऑफिस असलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी गर्दी केल्याने प्रभाग क्षेत्र कार्यालयाचा परिसर सर्वच राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार त्यांचे समर्थक, पक्षाचे झेंडे, पक्षाच्या घोषणाबाजींनी फुलून गेला होता.

पालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे पक्ष, भाजपा, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, काँग्रेस (आय) राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी व अपक्ष आदी पक्षातून निवडणूक लढविणाऱ्या जवळ पास साडे पाचशे ते सहाशे इच्युक उमेदवारांनी पालिकेच्या कल्याण डोंबिवली,आंबिवली शहरातील विविध नऊ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम क्षणा पर्यंत इच्छुक उमेदवारांना निवडणूक निर्णय कार्यालयात प्रवेश दिल्याने उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरा पर्यंत सर्वच निवडणूक निर्णय कार्यालयात सुरू होती.

# गिरीश कंटे यांना हुतात्मा स्मारक समितीचा "हुतात्मा गौरव 2026 " पुरस्कार जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : कर्जत तालुक्याच्या इतिहासातील रक्तरंजित पान ठरलेल्या हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदानाच्या स्मृती जागविण्यासाठी स्थापन झालेल्या हुतात्मा स्मारक नेरळ ही राष्ट्रभक्तीची जाणीव असलेली संस्था दरवर्षी समाजात निःस्वार्थी भावनेतून कार्यरत असलेल्या व्यक्तींना हुतात्मा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

यावर्षी हा पुरस्कार हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या समर्पित कार्यावर संशोधन करून क्रांती कार्याचा प्रसार आणि प्रचार केल्याबद्दल लेखक गिरीश कंटे यांना तसेच त्यांच्यासोबत चामटोली बदलापूर येथील

**बदलापूर येथील भारतातील पहिले अपंग प्राण्यांचे अनाथालय चे संस्थापक अध्यक्ष गणराज जैन यांना जाहीर झाले आहे.**

भारतातील पहिले अपंग प्राण्यांचे अनाथालय चे संस्थापक अध्यक्ष गणराज जैन यांना जाहीर झाले आहे.

हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या त्र्याऐशी व्या बलिदान दिनी २ जानेवारी रोजी हा पुरस्कार सोहळा नेरळ येथील हुतात्मा चौकात सायंकाळी साडेपाच वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार



सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते आणि कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ह्या कार्यक्रमात नेरळ येथील हुतात्मा स्मारकात उभारण्यात आलेल्या शेतकरी आणि कामगारांचे प्रतीक असलेल्या हुतात्मा स्तंभाचे लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

" हुतात्मा गौरव २०२६ " पुरस्कार हा ज्या क्रांती लढ्याचे प्रतिबिंब समजले जाते,त्या हुतात्म्यांच्या जीवनावर आधारित गिरीश कंटे यांनी गेली पंचवीस तीस वर्षे व्यासंग पूर्वक लेखन करून आझाद दस्ता,बलिदानाचा साक्षीदार, इन्कलाब, समर्पणाची गाथा, समर्पण, समर्पणाला वंदन,स्वातंत्र्यवीर गोमाजी पाटील,क्रांती पर्व ,क्रांतिवीर धोंडू केशव देसाई ही पुस्तके लिहून खऱ्या अर्थाने हुतात्मा भाई कोतवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या क्रांती कार्यावर प्रकाशझोत टाकला आहे.विविध वृत्तपत्रात हुतात्म्यांची गाथा,अनेक स्मरणिका,ध्वनिफीत,प्रकाशित करून क्रांती कार्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा ह्यासाठी ते कार्यरत आहेत.

.ह्या पुरस्कार सोहळयास माजी आमदार सुरेश भाऊ लाड, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे,माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे,पोलिस उप अधीक्षक राहुल गायकवाड, कर्जतचे तहसीलदार डॉ.धनंजय जाधव, नेरळचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राहुल आरोटे,कर्जत नगर परिषदेच्या नगराध्यक्षा पुष्पा दगडे,माथेरान नगर परिषदचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी,नेरळ ग्रामपंचायत चे प्रशासक सुजित धनगर हे उपस्थित राहणार आहेत.

ह्या कार्यक्रमांचे औचित्य साधून भारतीय सैन्य दलातील निवृत्त जवान डॉ.कुशाग्र पटेल, ऍड रमाकांत तरे,कुमार जाधव,अर्जुन शिंदे,किरण कांबरी हे उपस्थित राहणार आहेत.

# जेष्ठांचे स्नेहसंमेलन व सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशिंद** : ज्येष्ठ नागरीकांनी एकत्र येऊन जिवनातील जून्या आठवनिंना दिला उजाळा. हा योगायोग भिवंडी गटाने घडून आणला. होता. भिवंडी गटाचे गटसभापती सुभाष खिसमतराव यांनी या कार्यक्रमाची संकल्पना गटाकडे मांडली होती. या कार्यक्रमाचे वैश्य समाजाकडून कौतूक होत आहे.

ज्येष्ठ झाला म्हणजे त्या व्यक्तीकडे कुटुंबाकडून दुर्लक्ष केले जाते. अशा अनेक घटना आपण ऐकत असतो पहात असतो. वय झाल्याने ज्येष्ठांना घराच्या बाहेर स्वतःहून जात येत नसल्याने ईच्छा असतानाही तरुण पणातील मित्रांबरोबर



जाऊन मौजमजा, गप्पा-गोष्टी करता येत नाही. त्यामुळे त्यांचे मन दुःखी असल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळत असते. याची दखल भिवंडी गटाने घेऊन वैश्य समाजातील ८० ज्येष्ठ नागरीकांचा एका फार्महाऊसवर स्नेहसंमेलन आयोजित करून ज्येष्ठांच्या जून्या आठवणींना ऊजाळा दिली. या सेहसंमेलनात शारीरिक आजार विसरून ज्येष्ठांनी डीजेच्या गाण्यावर ताल धरून आनंद लुटला. भिवंडी गटाने आमचा सन्मान केल्याबद्दल अनेक ज्येष्ठांनी समाधान व्येक्त करून आशिर्वादही दिला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गटातील समाज बांधवांनी विषेश मेहनत घेतली. या कार्यक्रमाला वैश्य समाजाच्या पदाधिका-यांनी हजेरी लावली होती.

# महायुतीमुळे भाजपानंतर शिवसेना कार्यकर्त्यांचीही नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत आता नारीज नाट्य चांगलेच रंगले आहेत. काहींना उमेदवारी मिळाली नाही म्हणून तर काहींना प्रभाग सुटला नाही म्हणून. तर काही जण युती झाली आहे म्हणून नाराज आहेत. ही नाराजी आता बाहेर येवू लागली आहे. त्यातूनच एकनाथ शिंदेंचे कट्टर समर्थक कैलाश शिंदे यांनी माझी पक्षातून हकालपट्टी करा अशी मागणी एकनाथ शिंदेंकडेच केली आहे. त्यासाठी त्यांनी पत्र लिहीले आहे. त्यात त्यांनी आपली हकालपट्टी का करा याची कारणेच दिली आहे. यावेळी त्यांनी भाजपवर आगपाखड करताना आपल्या पक्षावरही टीकेची झोड उठवली आहे. या मुळे कल्याण डोंबिवलीतील राजकीय वातावरण चांगलेच तापवे आहे. तर शिवसेनेचे कल्याण पूर्व उपशहर प्रमुख मनोज चौधरी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. युतीमुळे आपल्याला तिकीट मिळणार नसल्याच्या कारणास्तव पद सोडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

कैलाश शिंदे यांनी शिंदेनाच लिहीलेल्या पत्राची सध्या चांगलीच चर्चा आहे. ते पत्रात लिहीतात कल्याण डोंबिवली महापालिकेत चार प्रभागाची निवडणूक लागली आहे. सामान्य उमेदवाराला चार प्रभागाचा खर्च परवडणारा नाही. चांगले काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची पक्षाला कदर राहीलेली नाही. शिवाय भाजप सोबत झालेली युती आपल्याला अजीबात मान्य नाही. गेली 20 वर्षा आम्ही भाजप सोबत लढत आहोत. भाजप हा पक्ष आपल्याला बिल्कुल आवडत नाही. त्यांनी लोकसभेनंतर विधानसभेला शिवसेनेचे काम केले नाही. त्यांचे काम आता आम्ही का करावे? अशा स्थितीत पक्षात राहून काम कसं करायचं. त्यामुळे नाव खराब करण्यापेक्षा मला पक्षातून काढून टाका अशी थेट मागणी कैलास शिंदे यांनी पत्रा द्वारे एकनाथ शिंदेंकडे केली आहे.

# ठाकरे गटाचे खंदे समर्थक किशोर जैन यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तसेच नागोठणे परिसरातील ठाकरे गटाचे खंबीर आणि प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे किशोर जैन यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

हा प्रवेश सोहळा महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी किशोर जैन यांचे पक्षात स्वागत करत त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव केला.




यावेळी बोलताना किशोर जैन म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विकासाभिमुख विचार, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांबाबतची ठाम भूमिका आणि तटकरे कुटुंबाचे नागोठणे व कोकणातील भरीव नेतृत्व पाहून आपण हा निर्णय घेतला आहे. आगामी काळात नागोठणे परिसरासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आपण कटिबद्ध राहणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी किशोर जैन व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत करत सांगितले की, या प्रवेशामुळे पक्षाची संघटनात्मक ताकद वाढणार असून नागोठणे परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक सक्षम होईल. मंत्री अदिती तटकरे यांनीही महिला, युवक आणि सर्वसामान्य घटकांच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच किशोर जैन यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेशामुळे नागोठणे परिसरातील राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# थर्टीफर्स्टच्या रात्री दारू पिऊन गाडी चालवल्यास तळीरामांवर होणार कायदेशीर कारवाई

## - पोलीस निरीक्षक संदीप बागुल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : येणाऱ्या नवीन वर्षाच्या आनंदामध्ये विरजण पडणार नाही त्या दृष्टीने आज उद्या आणि थर्टी फर्स्टच्या रात्री जे मोटार सायकलस्वार दारू पिऊन गाडी चालवताना दिसल्यास, एकाच गाडीवर तीन सीट घेतलेले दिसल्यास त्याच बरोबर कमी वय वर्ष असलेल्या मुलांनी गाडी चालवताना दिसून आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात



येईल यासाठी तरुण-तरुणींनी कायद्याचे उल्लंघन करू नये असे जाहीर आवाहन पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी पेणसह रायगडच्या नागरिकांना केले आहे

आगामी येऊ घातलेल्या नवीन वर्षानिमित्त ठिकठिकाणी पार्टीचा आयोजन केले जाणार आहे हॉटेल्स फार्म हाऊस आधी सर्वच ठिकाणी धाडसत्र टाकून चेक केले जाणार असून पेण पोलीस रायगड पोलीस सतर्क असून चौका चौकात नाकाबंदी केली आहे आपली सुरक्षितता हेच आमचे ध्येय असून मादक पदार्थाचे कोणीही सेवन करणार नाही दारू पिऊन कोणीही गाडी चालवणार नाही याची योग्य ती दक्षता घ्यावी आणि नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केले आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024